महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष सहावे ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०१६ पाने–१२

**संपादकीय**

## विभाग संमेलने

महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन वर्षातून एकदा भरते. ते महाराष्ट्राच्या एखाद्या कोपऱ्यात होते. त्यामुळे इच्छा असूनही काही पक्षीमित्रांना तिथे हजर राहता येत नाही. वेळेचा, रजेचा प्रश्न असतो. विभागीय संमेलन झाले तर त्या विभागातील अधिकाधिक मित्रांना हजेरी लावता येते. संमेलन फारसे खर्चिक नसते. त्या विभागातील प्रश्नांचा विचार होऊन मार्गही निघू शकतो. या धारणेतून विदर्भात अशी संमेलने फार पूर्वीच सुरू झाली. आतापर्यंत त्यांची १६ संमेलने झाली. कोकणातही चार विभागीय संमेलने झाली. उर्वरित महाराष्ट्राचा विचार करता मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र हे विभाग संभवतात. तिथल्या पक्षीमित्रांनी त्याबद्दल मनावर घेतलेले नाही. उत्तर महाराष्ट्राने उशिराने का होईना पहिले संमेलन फेब्रुवारी २०१६ अखेरीस वाघूर धरणावर आयोजित केले होते. मात्र आयोजकांना फोन करून, इ-मेल करूनही अद्याप अहवाल आलेला नाही. आपल्या विभागात काय घडले आहे, काय प्रश्न आहेत यांचा ठसा संमेलनात उमटत असतो. त्याची माहिती इतरांना उपलब्ध करून देणे हा अशा अहवालाचा उद्देश असतो, तो सफल होत नाही. स्थानिक पक्षीमित्र आपल्यापरीने आपल्या क्षेत्रात काम करीत असतात. त्यांचे काम इतरांना कळल्यास त्यांनाही स्थानिक पातळीवर नवे उपक्रम आखण्यास प्रेरणा, चालना मिळू शकते. हाच तर उद्देश असतो संघटना करण्याचा, सहभाग वाढवण्याचा, दाद मागण्याचा. तेव्हा आपण करीत असलेल्या कामाबद्दल लिहिण्याचा, मुखर होण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी कार्यप्रवण व्हावे.

महाराष्ट्रातील इतर विभागातील पक्षीमित्रांनी विभागीय संमेलनाला प्रारंभ करावा. अशा संमेलन प्रसंगी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या कार्यकारी मंडळाची बैठक झाल्यास कार्यप्रसारास वाव मिळेल.

– दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, E-mail : dgadgil09@gmail.com

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

## अध्यक्षीय

यावर्षी संपूर्ण महाराष्ट्र होरपळून निघाला. पाण्यासाठी माणसाला वणवण करावी लागत होती. रेल्वेने पाणी पाठवले गेले. पाण्यावाचून किती जीव गेले. अत्यंत दुःखदायी गोष्टी होत्या. आता पाऊस पडला आहे. सर्व गोष्टी विसरून जाऊ. पण हीच वेळ आहे त्याचा विचार करण्याची. कृती करण्याची. भविष्यातील पाण्याच्या/पावसाच्या शाश्वततेसाठी नक्कीच एक काम करू शकतो. झाडे लावणे व ती जगवणे. आपण प्रत्येकाने एक तरी झाड लावूया. जगवूया. झाडे/जंगल असेल तर पाऊस आहे, पाणी आहे व पक्षीसुद्धा आहेत.

– भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# सफर पक्ष्यांच्या दुनियेची

पक्षीमित्र संमेलन म्हणजे पक्षिमित्रांची जणू पंढरीची वारीच. आषाढीला वारकऱ्यांची पाऊले जशी पंढरीकडे वळतात अगदी तेवढ्याच आतुरतेने पक्षिमित्रांना ओढ लागते ती जानेवारी महिन्यात येणाऱ्या पक्षीमित्र संमेलनाची. यावर्षी अगदी दुधशर्करा योग पक्षीमित्र संमेलन आणि ते देखील कोकणात. आयोजकांकडून संमेलनाचे ठिकाण व तारीख कळताच रेल्वे आरक्षण, नाव नोंदणी आदी औपचारिकता पूर्ण करून घेतल्या. कोकणातील पक्ष्यांची अनोखी दुनिया बघण्याची संधी आम्हाला गमवायची नव्हती. अमरावतीवरून वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती (WECS) चे तेरा सदस्य संमेलनाला जाण्यासाठी तयार झाले. विदर्भाच्या शुष्क कोरड्या भागात राहणाऱ्यांना सदाहरित जंगल, सागर, किनारे, हिरवळीने नटलेली छोटी छोटी गावे यांचे फार अप्रुप.

सुंदरवाडी खरं किती सार्थ नावं होते सावंतवाडीचे हे तिथे गेल्यावरच कळले. स्वच्छ, सुंदर, निसर्गाने हिरवळीची मुक्त हस्ताने उधळण केलेले हे शहर. शहराच्या मधोमध असलेला मोती तलाव शिंपल्यामधला मोतीच जणू. २२ जानेवारीला सायंकाळी आम्ही सावंतवाडीला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी पक्षी निरीक्षणासाठी सकाळी नरेंद्र डोंगराची वाट धरली. Shrilankan Frogmouth च्या शोधासाठी सूर्योदयापूर्वीच नरेंद्र डोंगरावर आम्ही पोहचलो. हा पक्षी निशाचर असल्याने दिवसा एखाद्या झाडाच्या फांदीवर स्तब्ध बसून राहतो. त्याचा रंग एखाद्या वाळलेल्या पानासारखा मातकट तपकिरी असल्याने त्याला शोधणं फारच कठीण असतं. बराच वेळ भटकंती करूनही Frogmouth चा काही पत्ता नव्हता. पण Eurasian Black Bird, White Bellied Blue Flycatcher, Blue caped Rock Thrush या पक्ष्यांनी आम्हाला मनसोक्त दर्शन दिले. Crimson Backed Sunbird अगदी छोटासा पक्षी पण आपल्या आवाजाने सारा डोंगर गजबजून टाकला होता त्याने. Crimson Backed Sunbird ची एक जोडी Powder Puff च्या झाडावर येऊन बसली. मकरंदावर मनसोक्त ताव मारत, उन्हात किती मोहक दिसत होते ते चकाकणारे इवलेसे पक्षी.

साधारण ९च्या दरम्यान आम्ही एका ठिकाणी Frogmouth ला बघण्यासाठी स्तब्ध बसलो. थोड्या वेळाने दूरवर दरीमध्ये काही हालचाल जाणवली. दरीमध्ये उंच झाडाच्या फांदीवर एक पक्षी बसून होता. कोतवाल पक्ष्याने त्याला उडवले तेव्हा जाणवलं तो Frogmouth होता. हा अनोखा पक्षी दिसला जरूर पण त्याचे निरीक्षण करण्याची संधी हुकली. पण त्याच्या ओझरत्या दर्शनाने सावंतवाडीत येण्याचं सार्थक झाल्यासारखं वाटलं. पक्षी निरीक्षण सत्राचा गोड शेवट झाला तो Malbar Pied Hornbill च्या दर्शनाने. सह्याद्रीसाठी हा पक्षी जरी विशेष नसला तरी WECSच्या टीमला त्याच्या अशा सहज दिसण्याने खूप आनंद झाला.

२५ जानेवारीला पहाटेच मिठागरेला जायला निघालो. वाटेत Malbar Grey Hornbill आणि Malbar Pied Hornbill हे दोन्हीही बघायला मिळाले. साधारण २५ ते ३० किलोमीटर गेल्यावर मिठागाराचा विस्तीर्ण प्रदेश सुरू झाला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाणी साठवल्याने दलदल तयार झाली होती. अशा पाणथळ जागा ह्या वेडर्स पक्ष्यांसाठी आदर्श असतात. अनेक पक्ष्यांचे थवे चिखलातून आपले भक्ष्य टिपत होते. Golden Plover, Spotted Redshank, Black Winged Stilt, Eurasian Curlew अशा अनेक पक्ष्यांची रेलचेल तिथे होती. आकाशात २० ते २५ फुटांवर एक शिकारी पक्षी घरट्या घालत होता. दुर्बिणीतून निरीक्षण केल्यावर स्पष्ट झाले. तो ऑस्प्रे होता. भारतात गोड्या किंवा खाऱ्या पाण्याच्या जलाशयाजवळ त्याचे वास्तव्य असते. मराठीत त्याला मीनखाई घार किंवा मच्छीमार अशी नावे आहेत. पट्टीचा हा मासेमार पक्षी हिवाळा सरताच युरोप, रशिया, लडाख, गडवाल इत्यादी भागात परतून प्रजनन करतो. पंधराच्या वर Brahminy Kite वर घिरट्या घालत होत्या. पांढऱ्या शुभ्र पोटावर विटकरी डोके आणि विशाल विटकरी पंख अगदी उठून दिसत होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे सकाळी बरोबर साडे सहाला परत प्रवासाला सुरुवात केली. वेंगुर्ल्याच्या सागरेश्वर बीचला पोहोचलो. मंदिरात दर्शन आटपून आरवली बीचकडे कूच केले. आरवली बीचकडे जाताना वाटेत मोचेमाळ जवळ दूरवर एक काळा पट्टा दिसत होता. एका पाणथळ जागेवर अनेक पक्षी बसले होते. हे नक्की पण कोणते ते कळत नव्हते. बाईक वळवून आम्ही त्या पाणथळ जागे जवळ गेलो. काही अंतर पायी चालत गेलो तेव्हा चक्क २०० च्या वर Glossy Ibis एका ठिकाणी बसले होते. मराठीत छोटा शराटी ह्या नावाने ओळखला जाणारा हा पक्षी ५ ते ६ च्या वर कधीही पाहिलेला नव्हता. दुपारच्या उन्हात त्याचे रंग चकाकत होते. अगदी सुंदर असेच दृष्य होते ते.

दुपारी तीनच्या दरम्यान आम्ही आरवली बीचला पोहोचलो. सुंदर स्वच्छ असा समुद्र किनारा. दूरदूर वर वाळू पसरलेली. किनाऱ्याच्या जसजसे जवळ जाऊ लागलो. तसतसे असंख्य थवे उडताना दिसायला लागले. शुभ्र पांढऱ्या रंगाचे हजारच्या वर Gulls आणि Terns. डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता एवढे विहंगम दृष्य होते ते! हे सर्व पक्षी किनाऱ्यावर विसावले तेव्हा आकाशातून पुष्पवृष्टी झाल्याचा भास झाला. एकएक पक्षी किनाऱ्यावर हळूच येऊन स्थिरावला. Pallash Gull, Caspian Gull, Black headed Gull, Brown Headed Gull, Gull billed Tern, Lesser crested tern, Sandwich tern असे अनेक पक्ष्यांचे थवे डोळ्यांचे पारणे फेडत होते. कितीतरी वेळ मध्येच Grater Sand Plover चा एक थवा अगदी जवळ येत होता. आमच्यापासून ६ ते ७ फुटांवर येऊन अगदी धिटाईने खेकडे टिपत होता. सात Grater Sand Plover आमच्या आजूबाजूला आम्हाला न भिता खेकडे पकडण्यात मग्न होते. तपकिरी रंगाच्या या इवल्याश्या खेकड्यांनी संपूर्ण किनाऱ्यावर रेतीच्या कणांनी जणू सुंदर रांगोळीच रेखाटली होती.

ह्याच अरवली बीचवर दोन खास वेडर्स आम्हाला बघायला मिळाले. ते म्हणजे Whimbrel आणि Eurasian Curlew. हे दोन्ही पक्षी आमच्यासाठी विशेष होते. मराठीमध्ये लहान कोरल व युरेशियन कोरल नावाने हे ओळखले जातात. युरेशियन कर्ल्यूची चोच ही पातळ आणि लांब असून जास्त बाकदार असते, तर लहान कर्ल्यूची चोच ही त्या मानाने थोडी आखूड पण आणि थोडी जाड असते. सूर्यास्तापर्यंत ह्या अनोख्या रंगमंचावर अनेकविध पक्षी

पान ३ वर...

पान २ वरून...

बघितले. सूर्यास्ताबरोबरच आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.

२७ जानेवारी सावंतवाडीला शेवटचा दिवस पाटेकर सरांनी सुचविल्याप्रमाणे तळकट वन उद्यानाला जायचे ठरले. मध्येच Crocodile Breeding Center ला थांबलो. नारळाची एक विस्तीर्ण बाग होती ती. त्या बागेच्या शेजारीच खोल दरीतून LCM नदी वाहत होती. नदीमध्ये १४ मगरी संथ विहार करीत होत्या. ह्या बागेच्या आजूबाजूला दाट झाडी होती. ह्या बागेत आम्ही Indian Skimiter, Babbler आणि Forest Wagtail पहिल्यांदा पाहिली. तळकट वनउद्यान ह्या ठिकाणाहून १५ ते १६ किलोमीटर लांब होते. नऊच्या दरम्यान आम्ही तेथून काढता पाय घेतला आणि तळकटकडे वळलो. ९:३० दरम्यान आम्ही तळकट वन बागेत पोहोचलो. दाट वृक्षवेली शांत व सुंदर पिवळसर उन्हाचे कवडसे जमिनीवर सुबक आकृत्या रेखाटत होते. दाट वृक्षवेलीमधून एक निखळ झरा वाहत होता. त्या झऱ्याकडे जाताना एका उंच झाडावर काही हालचाल जाणवली. दुर्बिणीतून निरीक्षण केले. निलपरी Asian Fairy Bluebird होता तो. मंत्रमुग्ध करणारे त्याचे सौंदर्य चमकदार निळा रंग काळ्या शरीरावर उठून दिसत होते. माणकाप्रमाणे लालबुंद डोळे रूबाबदार परीकथेतील एखाद्या पात्राप्रमाणे त्याच ते स्वर्गीय सौंदर्य बघूनच कळले, त्याला Fairy Bluebird किंवा निलपरी का म्हटलं जात असेल. जवळच सुरूच्या झाडावर Orange Minivet ही जोडी नजरेस पडली. गर्द नारंगी आणि काळ्या रंगाचा नर व नितळ पिवळ्या रंगाची मादी. निसर्गाने अगदी मुक्त हस्ताने रंगाची उधळण केली आहे ह्या सर्व पक्ष्यांवर. दुपारी ३ वाजता नाइलाजाने तळकट वरून निघावे लागले. संध्याकाळी ७:३० वाजताची रेल्वे होती. म्हणून सावंतवाडीला ५ वाजेपर्यंत पोहोचणे आवश्यक होते. एका अनोख्या विश्वातून परतीचा प्रवास सुरू झाला होता. पाच दिवसांच्या या कोकणभेटीमध्ये मी ५९ नवीन पक्षी बघितले. त्यापैकी कित्येक मनात घर करून गेले.

कोकणाबद्दल जेवढे ऐकले होते. त्याहून काकणभर सरसच आढळले. कोकण शांत स्वच्छ, सुंदर, माणसांच्या गर्दी पलीकडचे विश्व हे किती आनंददायी असते याचा अनुभव कोकणात येतो. माणसाने निदान काही वेळ तरी निसर्गाच्या सानिध्यात घालवावा. निसर्ग सानिध्यात मिळणाऱ्या सुखासारखे सुख जगात कुठेच नाही. निसर्गाच्या ह्या विश्वात तुम्हाला सहचर्य अनुभवायला मिळते. मोकळेपणा असतो. उत्साह असतो. निसर्गाचे विविध रंग आणि किमया तुमच्यासमोर असतात. पक्ष्यांच्या ह्या अद्भुत दुनियेची सफर नक्की करा...


– कु. ऋतुजा जयप्रकाश कुकडे

*डब्ल्युइसीएस, अमरावती. rutujakukade@gmail.com*

## स्वागत नव्या सभासदांचे (२५ जानेवारी २०१६ ते २७ मे २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ८९३ | श्रीमती उज्ज्वला दीपक थोरात | नागपूर | ९४२२६५८४१४ | u_thorat@gmail.com |
| ८९४ | कु. वैष्णवी मनोहर पोटे | – | ९८९०५४०२१० | vaishnavi_pote@yahoo.com |
| ८९५ | श्री. मकरंद मुकुंदराव कुलकर्णी | डोंबिवली | ९९६७८०५११९ | kulkarnimaku@gmail.com |
| ८९६ | श्री. नितीन जगन महाले | धुळे | ७७७४०८८२१३ | mahale.nitin777@gmail.com |
| ८९७ | डॉ. विनोद रामकृष्ण भागवत | धुळे | ९४२२२३८५२३ | bhagwatvr@gmail.com |
| ८९८ | सौ. गीतांजली पारिश देसाई | कोल्हापूर | ९८५०९६४७०७ | desaigeetanjali@yahoo.com |
| ८९९ | सौ. मालती अरुणराव राऊत | अमरावती | ९८९०५६६२०९ | - |
| ९०० | सौ. सोनाली प्रशांतराव हरणे | पुणे | ९७६३४६३६०५ | - |
| ९०१ | श्री. नानासाहेब कृष्णा पाटील | नाशिक | ७३८७२०७५११ | nanasahebpatil15@yahoo.in |
| ९०२ | श्री. धारराव मोहनराव साहेबराव | नाशिक | ७५८८०१६२७४ | msdharrao@gmail.com |
| ९०३ | सौ. वैशाली मोहनराव धारराव | नाशिक | ७५८८०१६२७३ | - |
| ९०४ | श्री. ह्रषिकेश उत्तमराव डेर्ले | नाशिक | ९४०४५६४१६४ | derlerushi@gmail.com |
| ९०५ | श्री. निवृत्ती दत्तात्रय घाटे | नाशिक | ९४२१५०५०३१ | nivruttighate@gmail.com |
| ९०६ | कु. संजिवनी डी. वाघ | अमरावती | ९४२३४२४७१९ | - |
| ९०७ | डॉ. नरेंद्र व्ही. हरणे | चंद्रपूर | ९८५०३५१५६५ | narendra_harney2008@rediffmail.com |
| ९०८ | श्री. दिलीप नारायण विरखडे | वर्धा | ७७७५८८३८६१ | dilipvirkhade@gmail.com |
| ९०९ | श्री. सागर नाना पाटील | नागपूर | ७०५७५५७१५७ | sagarnpatil9822@gmail.com |
| ९१० | कु. निलगिरी श्रेया राव | नागपूर | ९४०४०८८०३५ | neelagirishreya@gmail.com |

# नाशिकचा 'लेपर्ड मॅन' सुनिल वाडेकर



नाशिक जिल्ह्यात तब्बल १०८ बिबटे ट्रॅप करणारे वनपाल सुनील वाडेकर यांना दोन वर्षांपूर्वी पर्यावरणदिनानिमित्त महाराष्ट्र शासनातर्फे 'वन व वन्य व्यवस्थापन' या विषयात विशेष उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले होते. ते 'पक्षीमित्र'चे सभासद आहेत.

घटना २५ मार्च २०१२ ची शहाद्याजवळ एका विहिरीत बिबट्या पडतो आणि त्याला वाचविण्यासाठी नाशिकमधून एक वन अधिकारी आपल्या व्हेटर्नरी डॉक्टर मित्राला घेऊन शहादा गाठतो. दिवसभर यशस्वी ऑपरेशन मोहीम राबवून बिबट्याला विहिरीतून बाहेर काढतो. घराकडे परतता परतता पहाटेचे पाच वाजतात. गादीवर अंग टाकत नाही तोच फोन खणाणू लागतो, फोनवर माहिती मिळते नाशिकच्या क्रांतीनगरमध्ये बिबट्या आल्याची. वेळ न घालवता तो निघतो. त्या निष्पाप बिबट्याला वाचवायला तब्बल ५ – ६ तास परिश्रम घेत तो बिबट्या अखेर पकडला जातो. हा अधिकारी बिबट्या वाचविल्याचं समाधान करीत इतरांचे अभिनंदन करीत फिरतो! असा अजब अवलिया व वन्य प्राणी वाचविण्यासाठी न थकणारी एक्सप्रेस म्हणजे नाशिकचा लेपर्ड मॅन सुनील वाडेकर.

सुनील वाडेकर अन बिबट्या जणू समीकरणच होऊन बसले आहे. नाशिक जिल्ह्यात तब्बल १०८ बिबटे पकडण्याचे त्यांचे रेकॉर्डच म्हणावे लागेल. घोटी या मूळ गावापासून नाशिकला आल्यावर सटाणा कॉलेजमधून बी.एस्सी.चे शिक्षण पूर्ण केले. २००० साली प्रादेशिक निवड मंडळातर्फे निवड होऊन ते वन विभागात रूजू झाले. लहानपणापासून प्राण्यांची आवड व साहसामुळे वन विभागात काहीतरी वेगळे काम करण्याची त्यांची नेहमी धडपड असे. २१ फेब्रुवारी २००४ रोजी नाशिक शहरात आला पहिला बिबट्या. त्यावेळी कोणतेही ट्रेनिंग नाही की पकडण्याची साधनेही नाहीत. यामुळे रसोई हॉटेलजवळील हा निष्पाप बिबट्या नाहक मारला गेला. आणि हाच बिबट्या त्यांच्या बिबट्या संवर्धन मोहिमेसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांना माहीत होते की वन्य प्राणी वाचले तरच आपले पर्यावरण वाचणार आहे. म्हणूनच आजतागायत मगर, कोल्हे, तरस हरिण, ससे, लांडगे, माकड, मोर, साळिंदर आदींसह फ्लेमिंगो, शराटी, गिधाड, घार आदी हजारो प्राणी, पक्षी वाचविले आहेत. वन्य प्राण्यांना वाचविणे एवढे सोपे नसते. जोखीम पत्करून त्यांना वाचवावे लागते, असे वाडेकर सांगतात. १८ एप्रिल २०१२ वणी गडाच्या पायथ्याशी असलेल्या माडाणे या गावी बिबट्याला पकडताना त्याने केलेला हल्ला वाडेकरांसाठी अविस्मरणीय क्षणच म्हणावा लागेल. बिबटे शहरात येण्याचे कारण सांगतांना ते म्हणतात या प्राण्यांना जंगलात भक्ष्य उरलेले नाही. पाण्याची समस्या मोठी आहे. यामुळे ते गावाजवळ राहणे पसंत करतात. उसाची शेती हे आता बिबट्याचे प्रमुख आश्रयस्थान बनले आहे. वन्यजीव संरक्षणासाठी पुण्याच्या धर्तीवर कात्रजबागेप्रमाणे महानगर पालिकेने अनाथ पशू, प्राणी, पक्षी, सर्पांसाठी अनाथालय सुरू केले पाहिजे. तसेच रेस्क्यू सेंटर ही काळाची गरज असून त्यासाठीदेखील प्रयत्न होणे अपेक्षित आहे. बिबट्या पकडताना येणाऱ्या वाईट अनुभवाविषयी ते म्हणतात की बघ्यांची गर्दी हाच सर्वात मोठा प्रश्न असतो. यामुळे त्याला पकडताना अनेक अडचणी येतात, तर गावाकडे पुढारी, दमदाटी करतात तर काही टगे बिबट्याशी झुंजण्याचा प्रयत्न करतात. मग बिबट्याचा एक तडाखा त्यांना हॉस्पिटलचाच रस्ता दाखवितो. यासाठी गर्दी न करणे महत्वाचे ठरते. तसेच काही भागात ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात मदत देखील करतात. जाळ्या आणणे, दोरखंड बांधणे, शिडी आणणे आदी व्यवस्था ग्रामस्थ करतात. आजपर्यंत वाडेकरांनी अनेक ठिकाणी गावागावात बिबट्याविषयी जनजागृती कार्यक्रम केले आहेत. पशु वैद्यकीय महाविद्यालयातील युवा डॉक्टरांना मायक्रोचीपचे प्रात्यक्षिक दाखवून त्यांना वन्यप्राण्यांविषयी जनजागृती करीत आहेत. सुनील वाडेकरसारखा 'लेपर्ड मॅन' नाशिकला मिळाल्यामुळे जिल्ह्यातील बिबटे नक्कीच सुरक्षित राहणार आहेत.

- आनंद बोरा, नाशिक

*संपर्क : ९८२२२८६७५०*

# हिमालयन फॉरेस्ट थ्रश




पीटर अलूस्ट्रॉप आणि शशांक दळवी यांना २००९ मध्ये एक नवी पक्षी जात प. अरुणाचल प्रदेशात सापडली आहे. प्लेन-बॅक्ड थ्रशशी त्याचे बरेचसे साधर्म्य असल्याने तिचे वेगळेपण लक्षात येत नव्हते. त्याचा उलगडा झाल्याने ही नवी जात लक्षात आली.

# गोष्ट पहिल्या बर्ड फीडरची

नाशिकला अय्यरजींच्या बंगल्यास भेट दिली असता निसर्ग आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात पहावयास मिळाली. त्यांनी आपल्या बंगल्याच्या आवारात व गच्चीवर फुलझाडे, कृत्रिम घरटी, बर्ड फिडर असे विविध प्रयोग करून पक्ष्यांना आकर्षित केल्याचे दिसले. सायंकाळच्या वेळी त्यांचे आवार चिमण्यांच्या चिवचिवाटाने फुलून उठलेले बघितले. शिंपी, दयाळ, चिमण्या, सूर्यपक्षी अशा नाना रंगीबेरंगी पाखरांनी बंगल्याच्या परिसराला एक वेगळी शोभा आणली. आपल्याही फ्लॅटच्या अवतीभोवती पाखरांची गर्दी झाल्यास खऱ्या अर्थाने पक्षीमित्र बनल्याचे समाधान लाभेल, ही जाणीव त्यावेळी झाली.

या जाणिवेतून आम्ही पहिले बर्ड फिडर तयार केले. त्यासाठी एक थंडपेयाची टाकाऊ बाटली, प्लास्टिकची बशी व मजबूत दोरी हे साहित्य घेतले. बाटलीला वरच्या बाजूने धान्याचे दाणे भरता यावे यासाठी १- १/२" X १/२" कापले. बशीला मध्यभागी बाटलीच्या तोंडाएवढे भोक पाडले. बाटली बशीवर उपडी ठेवली व तिचे बशीच्या भोकातून बाहेर आलेले तोंड झाकणाने बंद केले. बाटलीला लटकवता यावे यासाठी वरच्या बाजूने मजबूत दोरी बांधली, असे झाले आमचे पहिले बर्ड फिडर.



योगायोगाने जागतिक चिमणी दिवस जवळच होता. तो मुहूर्त साधून हॉलच्या खिडकीत ग्रिलला आम्ही पहिले बर्ड फिडर लटकवले. माझा ५ वर्षाचा मुलगा शोण याला हा प्रकार भलताच आवडला. इतका की तो शाळेतून आल्यापासून हॉलच्या खिडकीतच बसून राहिला. चिमणी येत नाही तोपर्यंत मी जेवणार नाही, असा त्याने हट्ट धरला. हा त्याचा हट्ट मला मात्र चांगलाच भारी पडला. मी व माझ्या बर्ड फिडरवर पत्नी वृषा व मोठी मुलगी श्रुया यांनी चांगलेच तोंडसुख घेतले.

वृषा म्हणाली, "अहो, आपण ग्राउंड फ्लोअरला राहतो. वर्दळ असते. त्यामुळे एकही चिमणी येणार नाही, लिहून घ्या आणि शोण जेवला नाही तर बघा त्या बर्डफिडरचे मी काय करते ते."

शोणला सू आली पण बाथरूममध्ये न जाता त्याने ग्रिलमधूनच सू केली. समोरच्या वहिनींनी किचनच्या खिडकीतून हे बघितले. तशा त्या ओरडल्या. त्यांचा आवाज ऐकून वृषा किचनमधून बाहेर आली व तिने शोणला चांगलेच धोपटले.

"आता संध्याकाळी हटमध्ये बायका जमल्या की तुझ्या सू वरून मला चार शब्द ऐकवे लागतील. हे सगळं तुमच्या बर्ड फिडरमुळे झालंय. दोन तास झाले तरी एक चिमणी आली नाही आणि म्हणे, आता बघ चिमण्या कशा येतील आपल्या खिडकीत. मी सांगते पहिल्यांदा तो बर्ड फिडर काढा आणि सोसायटीतल्या झाडावर लावा. तुमच्या या मूर्खपणामुळे सकाळपासून माझा पोरगा उपाशी आहे."

बर्ड फिडरमुळे मला हे वृषाचे बोल ऐकून घ्यावे लागले. शेवटी मी शोणला कसेबसे समजावून खिडकीतच भरवले व खिडकीलगतच्या सोफ्यावरच झोपवले. शोण झोपला असताना दुपारी एक लंगडा चिमणा येऊन बराच वेळ ग्रिलवर बसून चिवचिव करीत होता. पण तो फिडर प्लेटवर बसला नाही. मी मनातल्या मनात तो प्लेटवर बसावा आणि त्याने बाजरी खावी यासाठी देवाकडे प्रार्थना केली. पण लंगड्या उडून गेला. पुढे आठवडाभर लंगड्या एकटाच ग्रिलवर यायचा पण बाजरी न खाता चिवचिव करून उडून जायचा.

श्रुया माझ्याकडे हसत हसत म्हणायची, "बाबा, हा लंगड्या तुमची शेवटची आशा आहे." तिचे बघून शोणही मुद्दाम चिडवू लागला. "बाबा, चिमणी आली. लवकर बघायला या." असं म्हणून मला बेडरूममधून हॉलमध्ये आणायचा आणि 'कसं फसवलं,' म्हणत हसायचा.

शेवटी स्वतःवरच वैतागून मी बर्ड फिडरची जागा बदलण्याचा निर्णय घेतला. सोसायटी कंपाउंडमधल्या सीताफळाच्या फांदीला बर्ड फिडर टांगला. तिथे रोज सकाळ-संध्याकाळ खूप चिमण्या जमायच्या. म्हणून ती जागा निवडली. पण नशीब किती बेकार की बर्ड फिडर लावल्यापासून चिमण्या तिथे बसायच्या बंद झाल्या. मी ते बर्ड फिडर लावलंय ही बातमी बघता बघता सोसायटीत पसरली.

दोन-तीन दिवस तसेच निघून गेले. पुढे एके दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे सोसायटीतील उद्यानाच्या कट्ट्यावर बायकांची सांजबैठक रंगात आली होती. एरवी ही साडी कुठून आणली? दुपारी कोणती भाजी बनवली? तिच्या मुलाला किती टक्के पडले ? आज रात्री तारक मेहता सिरीयलमध्ये काय घडणार? या अशा नेहमीच्या पठडीतल्या विषयांना बगल देऊन त्या एका गंभीर विषयावर चर्चा करताना दिसल्या. चर्चेचा विषय होता सीताफळावरील बर्ड फिडरला आलेले अपयश. नेमका मी त्याचवेळी तिथून जात असताना त्यांच्या तावडीत सापडलो.

बोंडे वहिनींनी हाक मारली, "अहो भावजी, सीताफळावर तुम्ही चिमण्यांसाठी जे लावलंय त्याचं काय झालं ते बघितलं का?"

मी विचारलं, "काय झालं?"

"चिमण्या तर आल्या नाहीत. पण मुंग्यांची मात्र मजा झाली.जाऊन बघा, मुंग्यांनी काय केलयं ते? साऱ्या बाजरीच पीठ केलंय."

"अरे बापरे!"

तेवढ्यात तेरकर वहिनी मध्ये बोलल्या, "माझ्या मते चिमण्या त्या प्लास्टिकच्या बॉटलला घाबरत असाव्यात. सीताफळाच्या झाडावर मुंग्या असतातच. त्यामुळे तुम्ही चुकीचं झाड निवडलं असं मला वाटतं."

मी 'हं' म्हटलं.

भाजी निवडता निवडताच सावंतकाकी बोलल्या, "अरे तू एवढा पक्ष्यांचा अभ्यास करतोस पण एक साधी चिमणी दाणा खायला आणू शकत नाहीस. मी तांदूळ वाळायला टाकले ना, की चिमण्या हुसकायला बसावं लागतं ठाण मांडून. तू एक काम कर, बाजरी काढून त्यात कणीचा तांदूळ भरं. अरे त्या विदर्भातल्या चिमण्या नाहीत. कोकणातल्या आहेत, हे विसरलास की काय?"

त्यांच्या या बोलण्याने साऱ्याजणी हसू लागल्या. त्यांना हसताना बघून मला कॉलेजची रॅगींग आठवली.

"चिमण्यांना कळणार कसं? की हे तुम्ही त्यांच्यासाठी ठेवलंय. खरं तर तुम्ही येथे चिमण्यांसाठी मोफत भंडारा चालू केला आहे अशी एखादी पाटी ग्रिलवर लावायला पाहिजे. मग बघा, कशी लाईन लागते चिमण्यांची!" ग्रुपमधल्या आणखी एकीने मोलाचा सल्ला दिला.

काहितरी महत्वाचे काम आहे, असे सांगून तिथून काढता पाय घेतला. दुसऱ्या दिवशी कोणाच्या नकळत मी सीताफळावरून बर्ड फिडरची बदली पुन्हा ग्रिलमध्ये केली. म्हटले, "काहीही झालं तरी आता येथून हे बर्ड फिडर हलवायचे नाही. माझ्या पक्षीप्रेमासाठी तरी त्यांना या फिडरवर दाणे खायला यावेच लागेल."

बर्ड फिडरमुळे मी नकळत लहान झालो होतो. चिव् चिव् ऐकू आली की लहान मुलासारखा खिडकीकडे धावत यायचो. पुढचे आठ - दहा दिवस तसेच गेले. आता लंगड्याच्या जोडीला कधी कधी दुसरा चिमणा पण ग्रिलमध्ये येऊ लागला. मी काही दाणे ग्रिलच्या खाली ठेवलेल्या फळीवर टाकून ठेवले. त्या दोघांनीही फळीवरचे दाणे खाल्ले. पण फिडरवर बसण्याचे कटाक्षाने टाळले. विणीचा काळ असूनही बर्ड फिडरला मिळालेल्या अपयशाने मी कमालीचा निराश झालो होतो. पुढे असेच काही दिवस निघून गेले. आणि अखेर ती दुपार चालून आली. मी नुकताच जेवून हॉलमधल्या सोफ्यावर लकटलो. तोच एक चिमणा (लंगडा नाही) ग्रिलवर आला. फिडर प्लेटवर बसला व दाणे खाऊ लागला. मी ते दृश्य बघून वेडाच झालो. श्रुया माझ्या पायाशी सोफ्यावर बसून मोबाईलवर गेम खेळत होती. तिला हलकेच पायाने खुणावले. ती पण खुश झाली. तिने हळूच मोबाईलमधून दाणे खाणाऱ्या चिमण्यांचा फोटो टिपला. आणि मुठी आवळत ती म्हणाली, "यस्स ! बाबा, तुम्ही जिंकला."

दुपारची वामकुक्षी घेऊन झाल्यावर बाहेर हॉलमध्ये आलेल्या वृषाला श्रुयाने फोटो दाखवला. तो तिने सोसायटीतील महिला मंडळाच्या व्हॉटस ॲप ग्रुपवर शेअर केला. अभिनंदनाचे मेसेज आले. तब्बल एक महिना वाट पहिल्यावर चिमण्यांना माझी दया आली होती. नंतर रोज त्या एक-एक करून येत मनसोक्त दाणे खाऊ लागल्या. मग वृषाने आणखी एक बर्ड फिडर स्वतःहून ग्रिलमध्ये लावले. तेरकर वहिनींनी, बोंडे वहिनींनी बर्ड फिडर बनवून मागितले. त्यांनीही ते आपल्या घरी लावले. आज त्यांच्याही ग्रीलमध्ये चिमण्या आनंदाने दाणे खात आहेत. बोंडे वहिनींनी कांगचे दाणे आणले. चिमण्या तेही आवडीने खात आहेत. तेरकर वहिनींनी सुरुवातीला बाजरीऐवजी ज्वारी टाकली, तर चिमण्यांऐवजी कबुतरे आली. मग त्यांनी ज्वारी काढून बाजरी टाकली तेव्हा चिमण्या येऊ लागल्या. उन्हाळा वाढला तसं वृषाने स्वतःहून पाण्याचे भांडे ग्रीलमध्ये ठेवले. लंगड्याने जिन्यातल्या बंद पडलेल्या ट्यूबलाईटवरील खाचेत एका तरुण चिमणीसोबत संसार थाटलाय. तो आणि त्याची नववधू दोघेही आता जोडीने फिडरवर येतात.

येणाऱ्या चिमण्या खाऊन पिऊन मस्त उडून जाताना पाहून जो आत्मिक आनंद मिळतोय तो खरंच शब्दात मांडता येणं शक्य नाही. श्रुयाने मैत्रिणींना घरी आणून बर्ड फिडर दाखवला. शोण येता-जाता फिडरकडे बघत असतो. एकदा क्रिकेट खेळता खेळता मध्येच धावत तो ग्रीलजवळ आला. बाजरी खाणाऱ्या कावळ्याला त्याने हुसकावून लावले. "हे दाणे माझ्या बाबांच्या चिमण्यांसाठी आहेत" असा सज्जड दमही त्याने त्या कावळ्याला दिला.

एकंदर काय, बघता बघता पहिल्या बर्डफिडरने चिमण्यांचीच नाही तर आमच्या साऱ्यांची मनं जिंकली. मित्रांनो तुम्हीही असा हा प्रयोग करा. मग बघा, पाखरांशी हरवलेलं आपलं नातं या निमित्ताने तरी नक्की जुळून येईल.

- सचिन मेन, पालघर

*संपर्क : ८४४६२४८८८४*

## त्रैमासिक निधी

(३० सप्टेंबर २०१५ ते २७ मे २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रोहित पाटील | मुंबई | ५,०००/- | ५ एप्रिल २०१६ | २१९१ |

## देणगी

(३० सप्टेंबर २०१५ ते २७ मे २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुधीर दामले | मुंबई | १,०००/- | ३ मार्च २०१६ | ४९७ |
| २ | श्री. किरण देशमुख | मुंबई | १०,०००/- | ३ मार्च २०१६ | ४९८ |
| ३ | श्री. मधुकर जगताप | नाशिक | १०,०००/- | १४ मार्च २०१६ | ५२६ |

# एक सुरुवात

पक्षी निरीक्षणाचा आनंद किती मोठा व समाधानकारक असतो हे एका पक्षीनिरीक्षकालाच समजू शकते. लहानपणापासूनच मला पक्ष्यांची वृत्तपत्रात आलेली वेगवेगळी कात्रणे जमाकरण्याचा छंद आहे. त्यातूनच मला पक्षी निरीक्षणाची आवड निर्माण होत गेली आणि मग घराबाहेर पडलं की जे काही पक्षी दिसतील त्यांचे निरीक्षण करत करत पुढे जायची ही सवयच जडली.

असंच दोन महिन्यांपूर्वी एकदा आमच्या गावी गेले असताना सहज शेतात फिरत असताना विहिरीजवळ गेले अन् विहिरीतून काहीतरी बाहेर उडत आल्याचं मला दिसलं. ते काय होतं, हे पाहण्यासाठी मी त्याचा मागोवा घेतला पण मला नाही दिसलं ते. परत दुसऱ्या दिवशीसुद्धा हेच घडलं. मग मात्र मी जाणीवपूर्वक पाठलाग केला आणि काय आहे हे पाहण्याचा प्रयत्न केला. ते एक घुबडं होतं. पण घुबड हे निशाचर पक्षी असतात, असं मी वाचलं होतं. तशी घुबडांबद्दल मला फारशी माहिती नव्हती. पण एका कात्रणात मी वाचलं होतं की रानपिंगळा ही घुबडाची प्रजाती भारतातून नामशेष झाली आहे. आणि घुबडांची फक्त हीच प्रजाती दिवसा दिसणारी आहे. बाकी सगळ्या प्रजाती या निशाचर आहेत. त्यावरून मला वाटलं की हा रानपिंगळा असू शकतो. तसा विहिरीजवळचा परिसर हा डोंगराळ असून मनुष्यवस्तीपासून लांब आहे. त्यामुळे मला त्याचं घरटं असण्याची शक्यता वाटली. मग मी घुबडांच्या विणीच्या हंगामाबद्दल माहिती घेतली तर साधारणतः हिवाळा हा ऋतू त्यांचा घरटे बांधण्याचा असतो. मग तर माझी खात्रीच झाली. पण माझ्याजवळ कॅमेरा नसल्यामुळे मला त्याचे फोटो घेता येईनात आणि दुर्बिण नसल्यामुळे त्याचं व्यवस्थित निरीक्षण करता येईना. कारण थोडं पुढे गेलं, जवळ गेलं की लगेच ते उडून जायचं. पण मी जेव्हा जेव्हा पहिलं तेव्हा तेव्हा मला ते दिवसाच वावरताना, उडताना दिसायचं आणि त्या विहिरीच्या आसपासच आसायचं. त्यामुळे तिथे त्याचं घरटं असण्याची शक्यता होती.

जर हे घुबड 'रानपिंगळा' असेल तर माझ्यासाठी खूप मोठी संधी होती. रानपिंगळ्याच्या अभ्यासाची, निरीक्षण करण्याची. म्हणून मी माझ्या मित्राच्या मदतीने एक कॅमेरा मिळवला आणि त्याचे फोटो घेतले. एक तर पक्ष्याच्या फोटोग्राफीचा तो पहिलाच अनुभव होता, पण बऱ्यापैकी चांगले अनुभव मिळाले. फोटो घेतल्यानंतर मला त्याचं बारकाईने निरीक्षण करता आलं. त्याचा डोक्याचा रंग, पाठीचा, पोटाचा रंग, शेपूट इ. आणि मग मी नेटवरून 'रानपिंगळ्याचे' फोटो पाहिले. मग मला समजलं, की हा रानपिंगळा नसून साधा ठिपकेवाला पिंगळा आहे.

या सगळ्यावरून मला एखाद्या पक्ष्याचा अभ्यास करायचा, निरीक्षण करायचं म्हणजे नेमकं काय? हे समजलं. आणि खऱ्या अर्थाने पक्षीनिरीक्षणाला एक सुरुवात झाली याचा खूप आनंद वाटतो.

- स्नेहा ढाकणे

*पाथर्डी. अ. नगर*

# आपली वसुंधरा (पृथ्वी ग्रह) का वाचवायची?

(डॉ. एस. व्ही. नरसिंहन 'पक्षीमित्र' या नात्याने २०१५च्या वन्यजीव सप्ताहानिमित्त निसर्गप्रेमींना इंग्रजीतून पाठविलेला पत्राचा मराठी अनुवाद.)

प्रिय मित्रांनो,

वर्षानुवर्षे आपण काही लक्ष वेधून घेणाऱ्या घोषणा, वाक्ये ऐकत आलेलो आहोत. त्या अशा - 'पृथ्वी वाचवा (Save Earth), निसर्गाचं रक्षण करा (Preserve Nature) आणि पर्यावरणाचं संधारण करा (Conserve Environment)'. व्यासपीठावरून करावयाच्या घोषणांचा हा मेळा आहे. आपली वसुंधरा आपण का वाचवायची आणि कोणासाठी? खूप विचाराअंती मला तीन कारणे आढळून आली आहेत.

पहिले कारण म्हणजे प्राणी आणि वनस्पती यांना आपल्या अवतीभोवती काय घडतं आहे हेच माहीत नसते. त्यांच्यामध्ये विचार करण्याची, विश्लेषण करण्याची कुवत नाही. उच्च विचार करण्याची क्षमता, अनुमान काढण्याची वैशिष्ट्ये ही फक्त मानवाकडेच आहे. तेव्हा असे जीवन वाचवण्यासाठी आपणच समर्थ आहोत.

दुसरं आणि महत्वाचं कारणं आहे ते, आपल्या वसुंधरेला आणि पर्यावरणाला हानी पोहचविण्यास आपणच जबाबदार आहोत. जमीन, पाणी आणि हवा यांच्या कधीही भरून न येणाऱ्या नुकसानीस आपणच कारणीभूत आहोत. तांत्रिकदृष्ट्या विचार करता ऱ्हास थांबविण्याची जबाबदारी आणि कर्तव्य आपलेच आहेत.

शेवटचे सर्वात महत्वाचे कारण आहे, ते माझ्या मते आपल्या अस्तित्वासाठी तरी आपली वसुंधरा वाचवली पाहिजे. चारपेक्षा जास्त वेळा पृथ्वीवर मोठ्या प्रमाणावर आपत्ती कोसळलेली आहे. आणि प्रत्येक वेळी जणू काही घडलेच नाही अशा परिस्थितीत निसर्गाने काही शतकात ती पूर्वपदावर आणलेली आहे. ही क्रांतिकारी कार्यवाही थांबलेली नाही आणि खात्रीशीररित्या चालू आहे.

म्हणजे निसर्गाला वाचविण्याची, रक्षण करण्याची आवश्यकता नाही. निसर्गाकडे संवर्धनाची, सांधण्याची क्षमता कायम स्वरूपाची आहे.

लोकसंख्या वाढीबरोबर आपण बराच बदल केलेला आहे. अन्न घेण्याच्या सवयी, वागण्याच्या सवयी, धावपळीत आणि नव्या रोगांना प्रतिकार करण्यात या पृथ्वीवरील जास्त धोकादायक कोण असेल तर तो मानव म्हणजे आपणच आहोत. तेव्हा नैसर्गिकरीत्या प्रथम नष्ट होणार आहोत ते आपणच. त्यासाठी आपल्याकडे काही मार्ग आहे का?

दुःखदायक बाब म्हणजे मानवाच्या या अगोदरच्या पिढ्या नामशेष झाल्या आहेत. पिढ्या म्हणजे आदिमानव. याच अर्थ आपणास जवळचे कोणी बंधू नाहीत, आपण एकटे आहोत!

तेव्हा आपण आपली एकमेव पृथ्वी अशी बनवू या की ज्यावरील जीवन हे आरोग्यदायी, सुखावह आणि संगीतमय, सुंदर असेल.

अनुवाद- बाळासाहेब कुळकर्णी

*अहमदनगर*

# ऋतु रंग बदलताना

किती सुंदर असतं ऋतूचं रंग बदलतानाचं रूप. गेली १५- २० दिवस झाले निसर्गदेवता व पक्षी विश्वात होणारे बदल पाहून मन भारावून गेलं आहे. फेब्रुवारीचा महिना हळूहळू थंडी कमी कमी होत नाहीशी होत आहे. उन्हाळ्याची चाहूल वृक्षांना लागली आहे. सर्व वृक्षांची पानगळती होत आहे. सुकलेली सोनेरी पानं हवेच्या झुळुकांसोबत झाडावरून गळून जमिनीवर पडत आहेत. जणू सोन्याचा पाऊस पडत आहे. जंगलाकडे पाहिलं तर सर्वत्र सोनं पांघरलेलं दिसत आहे. मेळघाटात सागवानाची झाडं अधिक प्रमाणात आहेत. सागवानाच्या झाडाची मोठी पानगळती होऊन जंगलाची संपूर्ण जमीनच व्यापून टाकली आहे. अशा सोन्याने न्हालेल्या मेळघाटाच्या जंगलात नववधूप्रमाणे चटकदार लाल रंगाची शालू नेसलेली पळसाची झाडं जागोजागी उठून दिसत आहे. पळसाचीसुद्धा पानगळती झाली व उरली फक्त लाल फुलांनी भरलेली झाडं. पळसाची फुलं किती सुंदर, हिरव्या-काळ्या देठावर पाच पाकळीचे फूल. बाहेरील पाकळी उमलून उलटी पडते व ही पाकळी जणू पोपटाची लाल चोच दिसते. उरलेल्या पाकळ्या पुंकेसराला घेरून टाकतात. फूल जवळून पहिल्यास जणू रेशीम वाटते व त्याचा स्पर्श रेशमापेक्षा मऊ. Flame of Forest हे पळसाचं इंग्रजी नाव आहे.

पळसाचा चटकदार रंग व मधाळ गंधाने पक्षी आकर्षित झाले नाहीत तर नवलंच नाही का? गुलाबी मैना(Rosy Starling) ह्या पक्ष्याला पळस मैना म्हणून सुद्धा ओळखलं जातं, कारण हिवाळ्यात स्थलांतर करून येणाऱ्या या पक्ष्याचे मोठे थवे सकाळी फुललेल्या पळसाच्या झाडावर दिसून येतात. परंतु यावर्षी पळस मैनांचे थवे मोठ्या प्रमाणात आले नाहीत.

पळसाच्या फुलांचा मधुर रसपान करायला फक्त पळस मैनाच आतूर असते असे नाही. जांभळा सूर्यपक्षी (Purple Sunbird) नर तर पळसाच्या झाडावर स्वतःच अधिपत्य गाजवतो. दुसऱ्या सूर्यपक्ष्याला झाडाच्या जवळपाससुद्धा फिरू देत नाही. गरज पडली तर चष्मेवाला (Oriental White Eye) सुद्धा तो फुलावरून पळवून लावतो. परंतु साळुंकी (Common Myna) व बुलबुलसारखे मोठे पक्षी आले तर त्यांचं काही चालत नाही. परंतु यावर सुद्धा जांभळ्या सूर्यपक्ष्याजवळ उपाय आहे. सतत चिव- चिव असा आवाज करून तो त्यांना झाडावरून जाण्यास भाग पाडतो.

पंचरंगी पोपटी पोपट यांना सुद्धा पळसाच्या फुलांची ओढ आहे. त्यांना फुलातील रसपान करता येत नाही. म्हणून ते सुंदर पाकळ्या खाऊन भूक भागवतात. कधी कधी वाटते पोपटाच्या लाललाल चोचीला पळसाच्या फुलांचा रंग तर लागला नसावा!

पक्ष्यांची उन्हाळ्यानंतर येणाऱ्या पावसाळ्याची लगबग आतापासूनच चालू झाली आहे. पाकोळी (Red Rumped Swallow) हा पक्षी घरटं बनवण्याच्या कामाला लागला आहे. पक्ष्यांचं घरटं म्हटलं की लगेच गवत व काड्यांपासून बनवलेलं घरटं डोळ्यासमोर उभं राहतं. परंतु या पाकोळीचं घरटं मातीचं असतं. चोचीनं बनवलेलं हे घरटं निष्णात कुंभारालासुद्धा बनवता येणार नाही. पडकी घरं, मंदिरं, कड्या कपाऱ्या यामध्ये हा घरटं बनवतो. नदी, तलाव काठावरील ओली माती इवल्याशा चोचीत घेऊन त्यात स्वतःची लाळ मिसळून एक-एक गोळा भिंतीवर चिटकवून महत प्रयासांनी घरटं बांधलं जातं. हे घरटं वाटीच्या आकाराचं असतं.

दुसरीकडे टिटवी (Red Wattled Lapwing) चे जोडीदारासोबत मधुर मीलन चालू झालेलं आहे. एरवी सतत टिव टिव करणारी टिटवी मीलनासाठी वेगळ्याच प्रकारचा टिवटिवाट करून नराला मीलनासाठी बोलवते. नर जवळ येताच गुडघ्यात अलगद वाकून जमिनीवर शरीर फुगवून बसते व नंतर नर मादीच्या पाठीवर दोन्ही पाय ठेवून चढतो व मीलन होते.

एकीकडे नदीच्या पात्रात टिटवीचं मीलन चालू आहे तर दुसरीकडे सुबाभूळच्या झाडावर तांबटानं (Coppersmith Barbet) झाडाच्या फांदीवर अगदी कंपासने काढावं एवढं गोलं छिद्रं बनवलं आहे. चोचीने बनवलेल्या छिद्रामधील कप्प्यात मादी अंडी देणार आहे.

विदेशी स्थलांतरित पक्ष्यांचा परतीचा प्रवास चालू झाला आहे. एकेक बदल होत राहणारच आहे.

- डॉ. संदीप म. साखरे

*अकोला (विदर्भ). ९९२२२२५३४१, sandysakhare@gmail.com*

## स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ९११ | कु. सांगळे रूचिका राजेंद्र | धुळे | ९४०३६५५१६१ | ruchikasangle@gmail.com |
| ९१२ | श्री. सुरेश प्रभाकर शिंदे | नाशिक | ८८५५०६५३११ | sureshshinde.lbp@gmail.com |
| ९१३ | श्री. सुधर्व खर्डेनविस | नागपूर | ७३८७६४६६१० | sudharva96@gmail.com |
| ९१४ | कु. शिवानी सुनिल तिनगसे | वर्धा | ९९६०८०९६१९ | shivani.tingase@gmail.com |
| ९१५ | श्री. उधमसिंग कुलरामजी यादव | नागपूर | ९८२३०२८२४४ | ideas@yahoo.com |
| ९१६ | श्री. शशिकांत आर. सित्रे | चंद्रपूर | ९८८१७२३६१२ | shashikant_sitre2008@rediffmail.com |
| ९१७ | डॉ. विवेक निळकंठराव शिंदे | चंद्रपूर | ९८२२७२२१७७ | drviveknshinde@rediffmail.com |
| ९१८ | श्री. संदीप जे. जिवने | भद्रावती | ९८८१५८६१५६ | sschannel1@gmail.com |
| ९१९ | श्री. संतोष बाळकृष्ण रामटेके | चंद्रपूर | ९८५०३९३१९१ | sro.santosh@gmail.com |

# रिकामे घरटे

पावसाळ्याच्या आधी एका साळुंकीच्या जोडीने आंब्यावर बांधलेल्या डब्यात घरटे करण्यास सुरुवात केली. नर-मादी गवत व इतर गोष्टी आणून डब्यात ठेवत होते. बघता बघता घरटे तयार झाले. घरट्याच्या बाजूला पक्ष्यांचा वावर कमी झाला म्हणजेच आई साळुंकी अंडी उबवायला बसली होती. थोड्या दिवसांनी पिल्लांचा आवाज ऐकू येऊ लागला. आई-बाबांची लगबग वाढली. दोघेही सतत पिल्लांना भरवत असत. काही दिवसांनी पिल्ले थोडी मोठी दिसू लागली.

एके दिवशी सकाळी बागेत साळुंक्यांचे कर्कश्य ओरडणे ऐकू येऊ लागले. बघितले तर साळुंकीचे एक पिलू जमिनीवर होते व दोन साळुंक्या त्याला टोचत होत्या. साळुंक्या ओरडत होत्या. त्याचबरोबर ते पिल्लू केविलवाणे ओरडत. स्वतःला त्यांच्यापासून वाचवत उडण्याचा प्रयत्न करत होते. पण फार उंच उडण्याची त्याच्यात ताकद नव्हती. मी दोन्ही साळुंक्यांना हाकलून त्या पिल्लाला घरात आणून टबमध्ये ठेवले. पण ते पिल्लू थोडे मोठे होते, टबमधून सतत बाहेर येत होते. त्याला खाणे काय द्यायचे हादेखील प्रश्नच होता म्हणून मी त्याला पायाला दोर बांधून बाहेर झाडाखाली बांधले. पण त्याला स्वतःसाठी अन्न मिळविणे जमत नव्हते. मागे दयाळ पक्ष्यांनी जसे स्वतःच्या पिल्लाला भरवले तसे साळुंकी आई-बाबांचे सहकार्य नव्हते. उलट ते दोघे आळीपाळीने त्याला टोचायला बघत होते व ते पिल्लू केविलवाणे ओरडत होते. त्याचवेळी त्यांच्या आजूबाजूला दयाळ मात्र अस्वस्थ होऊन करूण आवाज काढत, घिरट्या घालत होते.

मी साळुंक्यांना बरेचदा हाकलले पण तेवढ्यापुरते त्या लांब उडून जात व परत थोडावेळाने येऊन पिल्लाला टोचायला सुरुवात करत. मांजरसुद्धा दबा धरून बसले होतेच. पायाला दोर बांधल्याने पिल्लाला स्वतःला वाचवणे कठीण जात होते. म्हणून नाइलाजाने मी त्याला बागेतील केळीच्या बनात सोडले. तेथे ते दोन दिवस होते. पण नंतर त्याचे काय झाले मला कळले नाही.

घरट्यातल्या दुसऱ्या पिल्लाला मात्र साळुंकी आई-बाबा व्यवस्थित भरवत होते. थोड्या दिवसांनी एका संध्याकाळी बागेत साळुंक्यांचा कलकलाट कानी आला. बघितले तर साळुंकी आई-बाबा घरट्याच्या बाजूने घिरट्या घालत होते व नेहमीप्रमाणे वेगळाच आवाज काढून घरट्यात असणाऱ्या पिल्लाला बाहेर यायला उद्युक्त करीत होते. पिलू घरट्याच्या भोकातून फक्त मान बाहेर काढून भेदरलेल्या नजरेने बाहेर बघत होते. थोड्याथोड्या वेळाने आई-बाबा प्रयत्न करत होते. पण पिलू मात्र घरटे सोडायला अजिबात तयार नव्हते. रात्र झाली व हे सर्व थांबले. मला मनोमन त्या पिलाचे कौतुक वाटत होते. त्याला शहाणे व हुषार ठरवून त्याच्या भावंडाला, जे वेळेआधी घरट्याबाहेर पडून संकटात सापडले होते, त्याला वेडे ठरविले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या विहिरीत एक साळुंकीचे पिलू मरून पडले होते. साळुंकीचे घरटे असलेल्या झाडाजवळच विहीर होती. मला वाटले की साळुंकीच्या घरट्यात त्या शहाण्या पिलाशिवाय अजून एक पिलू असणार व तेसुद्धा सक्षम नसताना घरट्याबाहेर पडल्यामुळे पाण्यात पडले असणार. मी त्या घरट्यावर नजर ठेवून होते. साळुंकी आई-बाबा पिलाला घरट्याबाहेर कसे काढतात हे मला पहायचे होते. थोड्या वेळाने साळुंकी आई-बाबा घरट्याबाहेर घिरट्या घालू लागले. वेगळाच आवाज काढत ते पिलाला साद घालू लागले. पण त्यांना प्रतिसाद मिळत नव्हता. मी समजले, विहिरीत पडलेले पिलू तेच होते. घरटे रिकामे झाले होते.

पण साळुंकी आई-बाबांचे वेडे मन ते मानायला तयार नव्हते. ते दोघेजण पिलाला आवाज देत घरट्याजवळ अस्वस्थ होऊन फिरत होते. थोड्या-थोड्या वेळाने घरट्याच्या तोंडावर बसून पिलू घरट्यात असण्याच्या आशेने घरट्यात डोकावत होते. मध्येच घरट्यात जाऊन थोडावेळ थांबत होते. आपले पिलू कुठे गेले हेच त्यांना कळत नव्हते. दोन दिवस आई-बाबा सतत येऊन पिलाला साद घालायचे. घरट्याच्या आतून-बाहेरून सर्व बाजूने त्याला शोधायचे. नंतर मात्र त्यांचे येणे हळूहळू कमी झाले व नंतर बंद झाले.

दुसऱ्या झाडांवर बांधलेल्या घरट्यांमधून पिलांनी बाहेर भरारी घेतल्यावर घरट्याला रिकामपण यायचे, ते आनंद देणारे असायचे. पण ह्या घरट्याला आलेले रिकामपण दुःखद होते.

– रेशमा स. गाळवणकर

## स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ९२० | श्री. अजय डी. दहेगावकर | चंद्रपूर | ९८९०५२८१२५ | ajaydahegaonkar@gmail.com |
| ९२१ | श्री. हरिहर एन. मोहरकर | भद्रावती | ९७६३२९२७३२ | moharkar.harihar@gmail.com |
| ९२२ | श्री. किशोर एस. खांडलकर | चंद्रपूर | ९८२२७०२३०१ | kishor4khusi@gmail.com |
| ९२३ | डॉ. प्रविणकुमार एन. नासरे | चंद्रपूर | ९२२५२११२७४ | - |
| ९२४ | डॉ. सचिन डी. मिसार | चंद्रपूर | ७७६७९०९४९४ | sachinmisar@rediffmail.com |
| ९२५ | डॉ. परेश रतनलाल पटेल | यवतमाळ | ९४२२१६९४६५ | - |
| ९२६ | श्री. ज्ञानेश्वर बुवाजी खामनकर | यवतमाळ | ९४२२१६६५९२ | dbkhamankar65@rediffmail.com |

## टपाल तिकिटांच्या दुनियेत

# कोल्लेरू पक्षी अभयारण्य

कोल्लेरू हे आंध्र प्रदेशातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे गोड्या पाण्याचे तळे असून ते कृष्णा व गोदावरी त्रिभुज प्रदेशात आहे. ह्या तळ्याचा पसारा कृष्णा व गोदावरी जिल्ह्यात सामावला आहे. ह्या तळ्यात मोसमात वाहणाऱ्या बदामेस व तमिलेस या छोट्या नद्यांचे पाणी जमा होते. ह्या तळ्याच्या दलदलीच्या प्रदेशात कोल्लेरू पक्षी अभयारण्य आहे.

हिवाळ्यात असंख्य स्थलांतरित पक्षी या तलावावर आश्रयास येतात. त्यात ग्लॉसी आयबिस, पेंटेड स्टॉर्क, ग्रे पेलिकन्स, एशियन ओपन बिल स्टॉर्क्स, व्हाइट आयबीस, टील्स, पीनटेल्स, शॉव्हेलर्स, रेड क्रेस्टेड पोचार्ड, ब्लॅक विंग स्टिल्ट, अॅव्होसेट, विजन्स, गडवाल्स, कॉर्मोरंटस, रेड शँक्स, गार्गनी, हेरॉन्स व फ्लेमिंगोज इ. या तळ्यात २ लाखांच्या संख्येने स्थानिक व स्थलांतरित पक्षी आश्रयास येतात. हे तळे त्यांचे महत्त्वाचे वसतिस्थान आहे. म्हणून नोव्हेंबर १९९९ मध्ये वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत या तळ्यास वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले गेले व नोव्हेंबर २००२ मध्ये आंतरराष्ट्रीय रामसर योजने अंतर्गत महत्त्वाच्या पाणथळ क्षेत्रांच्या यादीत समावेश केला गेला. या वन्यजीव अभयारण्याचे क्षेत्रफळ ३०८ चौ.कि.मी. इतके आहे.







कोल्लेरू पक्षी अभयारण्य वर्षभर पर्यटकांसाठी खुले असते. परंतु ऑक्टोबर ते मे ह्या काळात भेट दिल्यास निरनिराळ्या ठिकाणी उभारलेल्या निरीक्षण मनोऱ्यांवरून नयनरम्य अशा पक्षी निरीक्षणाचा आनंद घेता येतो. आगावू आरक्षण केल्यास पक्षी अभयारण्यापासून जवळ असलेल्या एलुरू (१५ कि.मी.) व विजयवाडा (७२ कि.मी.) येथील वनविभागाच्या विश्रामगृहात राहण्याची सोय होऊ शकते.


नाणे व टपाल तिकिट संग्राहक संघटना, पूर्व गोदावरी दहाव्या वर्धापन दिनानिमित्त भारतीय टपाल खात्यातर्फे कोल्लेरू पक्षी अभयारण्यावर विशेष पाकिट वितरित केले गेले. विशेष पाकिटावर पेलिकन पक्ष्यांचा समूह झाडांवर दिसत आहे. तसेच त्या पक्ष्याची मुद्रा अंकित केली आहे.

– रवींद्र वामनाचार्य
*मोबाईल : ९८९०३९०५२७,*
*इ-मेल : r_wamanacharya@yahoo.co.in*

## स्वागत

# पक्षिजगत

पालघर येथील आपले एक सभासद श्री. सचिन मेन यांच्या 'पक्षिजगत' या पुस्तकाचे प्रकाशन सावंतवाडी येथील संमेलनात झाल्याचे आपल्या वाचकांना आठवत असेल. ते बेळगावच्या तरुण भारत दैनिकाच्या खजाना पुरवणीत दोन वर्ष पक्षीविषयक लेखन करीत होते. त्यातून सादर झालेल्या शंभर लेखांचे पुस्तक नागपूरच्या साहित्य प्रसार केंद्राने प्रसिद्ध केले. लेखासोबत त्या पक्ष्याचे प्रकाश चित्र असायचे. पण या पुस्तकात प्रकाशचित्रांची चैन आहे. उत्तम गुळगुळीत कागदावर एकेक लेख तीन- चार पर्यंतच्या प्रकाशचित्रांनी रंगला आहे. त्यातील बरीचशी क्लेमंट फ्रांसीस, गुरूराज मूर्चिंग, भावेश राठोड इ. नामवंत वाईल्ड लाईफ फोटोग्राफर्सनी टिपलेली आहेत. इतक्या कलावंतांचे सहकार्य त्यांनी मिळवले हे विशेष आहे.




*पक्षिजगत, लेखक- सचिन मेन*
*प्रकाशक- साहित्य प्रसार केंद्र, नागपूर*
*पृष्ठे- २१६,किंमत रू. ३९५*

सचिन मेन हे निसर्गरमणीय अदिवासी बहुल अशा पालघर जिल्ह्यातले. त्यांचे बालपण निसर्गसानिध्यात गेले. लहानपणापासून त्यांना निसर्गात रमण्याची आवड होती. निसर्गात रमणारा माणूस पक्ष्यांकडे सहजी ओढला जातो. त्यांची रंगीबेरंगी दुनिया त्याला खुणावते. मग सहाजिकच प्रौढ वयात त्यांच्या नोंदी ठेवणे, दुर्बिणीतून निरीक्षण करणे, कॅमेरा हाती आल्यावर शक्य ती प्रकाशचित्रे घेणे, आपल्या नोंदीच्या खरेपणाबद्दल पक्षीतज्ज्ञांच्या पुस्तकातून डोकावणे हे ओघानेच येते. योग्य प्रसंग साधण्यासाठी तासनतास एकाग्र चित्ताने बसणे ही तर एक साधनाच असते.

शंभर पक्ष्यांच्या ओळखी सोबतच त्यांनी भारतीय पक्षीविज्ञानाचा इतिहास, पक्षिवर्गीकरण, पक्ष्यांचे स्थलांतर, त्यांच्याबद्दलचे समज गैरसमज यांचा धावता आढावा घेतला आहे.

# विकास की भकास?

विकासाच्या नावाखाली पहिला बळी जातो तो पाणथळ क्षेत्राचा. त्यानंतर क्रम लागतो गवताळ कुरणांचा. पाणथळीत भर टाकून ती हटवली जाते तर गवताळ जमिनीवर झाडे लावून वा इमारती उभारून तेथील पर्यावरण बदलले जाते. गेल्या शंभर वर्षात जगातील ५०% पाणथळी नाहीश्या झाल्या आहेत. जागतिक भूमीच्या ६% क्षेत्रावर पाणथळी आहेत.

जगातील गवताळ कुरणांनी ३४% कार्बन शोषून ठेवलेला आहे. युरोपात नव्याने झालेल्या वनीकरणातील ६०% क्षेत्रावर गवताळ कुरणे होती. युनेस्कोच्या व्याख्येप्रमाणे ज्या भूमीवर वनस्पती आहेत पण झाडे आणि झुडुपांची संख्या १०%हून कमी आहे, त्याला गवताळ कुरण म्हटले जाते. जगातील भूमीच्या ४०.६% भागावर गवताळ रान आहे.

ऱ्हासामुळे जगातील शुष्क भूमीचे प्रमाण गेल्या वीस वर्षात ११% ने वाढले आहे. जगाची एक तृतियांश भूमी मरू प्रदेश आहे. मरू प्रदेशातील २०% भाग वाळवंट आहे. अंटार्क्टिका हा जगातील सर्वात मोठा मरू प्रदेश आहे. तिथे फक्त शेवाळ सदृश वनस्पती वाढतात.

चीनमधील गोबी वाळवंटाचा विस्तार रोखण्यासाठी ४५०० कि.मी. लांबीची 'हिरवी भिंत' उभारण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. त्यासाठी दहा हजार कोटी झाडे लावली जातील.

*संदर्भ : नॉलेज, एप्रिल २०१६*

## स्वागत नव्या सभासदांचे (२५ जानेवारी २०१६ ते २७ मे २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ९२७ | श्री. पियुश चिमणलाल पटेल | यवतमाळ | ९८२२७०८४१३ | piyush_gtr@rediffmail.com |
| ९२८ | श्री. मुकुल मुरलीधर भोंडे | यवतमाळ | ९९७०१९५३५५ | mukul15@gmail.com |
| ९२९ | कु. अश्विनी बी. करांगळे | अमरावती | ९७६५२८१०२८ | ash.karangale11@gmail.com |
| ९३० | कु. अपेक्षा बंडू भुयार | अमरावती | ९८८१०२७८७९ | - |
| ९३१ | श्री. महेंद्र आर. बेंडकर | अमरावती | ९४२२९५६९१४ | bhendkar.insurance@gmail.com |
| ९३२ | श्री. हयात अख्तर कुरेशी | अमरावती | ९५७९६५५७१५ | hayatsays@gmail.com |
| ९३३ | श्री. राहुल रामराव तेलरांधे | वर्धा | ९८९००४२१८२ | nyp.mr.rahul@gmail.com |
| ९३४ | श्री. बाबाजी ज्ञानेश्वर घेवडे | वर्धा | ९८२२३४२७७० | bghewade@rediffmail.com |
| ९३५ | श्री. रवींद्र शरच्चंद्र पाटील | वर्धा | ९४२२१४११४२ | archravindrapatil@gmail.com |
| ९३६ | श्री. वैभव विजयराव देशमुख | वर्धा | ९८२३४२३४३६ | vvd82hatyre@gmail.com |
| ९३७ | श्री. दीपक एस. गुढेकर | वर्धा | ९४२३१२०७४१ | dipakgudhekar@gmail.com |
| ९३८ | श्री. वामन व्यंकटेश बालिगा | नाशिक | ९८५०३०८७७० | - |
| ९३९ | श्री. समीर मुरलीधर महाजन | नागपूर | ७१२२२८६६०४ | - |
| ९४० | श्री. प्रविण सुखदेवराव वाघ | यवतमाळ | ९७६७६६०९९८ | - |
| ९४१ | डॉ. गजानन बाबुराव संतापे | अमरावती | ९८५००५२६९२ | gajanan_santape@yahoo.com |
| ९४२ | श्री. रमकांत विठ्ठल इतेवाड | अमरावती | ९८५०३२६७७० | ramakantitewad@yahoo.com |
| ९४३ | श्री. सावन अजबराव येओतकर | अमरावती | ७७७५०७४४१७ | sawan.yeotkar555@gmail.com |
| ९४४ | डॉ. श्रृती शरदराव गिजरे | अमरावती | ९९६०२३६७१८ | shrutipande17@gmail.com |
| ९४५ | श्री. मुकुंद साहेबराव इंगोले | अमरावती | ९४२२१५५०४४ | mukeshingoleassociates@gmail.com |
| ९४६ | श्री. इंद्रप्रताप एस. ठाकरे | अमरावती | ७२१२५११९०१ | indrapratapt@gmail.com |
| ९४७ | कु. गौरी भालचंद्र खरे | पुणे | ९८९००६९४८६ | rawalegauri@gmail.com |
| ९४८ | श्री. गिरीश जगताप | धुळे | ९६६५८५३६७० | girish.jagtap9@gmail.com |

कागदाची देणगी: नाशिक येथील आपले सभासद श्री. शिवाजी बच्छाव यांनी या अंकासाठी लागणारा कागद दिला आहे. त्यांचे आभार.

**आपण लिहिता...**

पक्षीमित्रचे सर्वच अंक वाचनीय असतात. त्यातील लेख माहितीपूर्ण व ज्ञानात भर घालणारे असतात. अनेक विषयांची हाताळणी केलेली आढळते. एप्रिल २०१५ च्या अंकात प्रसिद्ध झालेली पक्ष्यांच्या मराठी नावांची सूची हा उल्लेखनीय उपक्रम आहे. डॉ. राजू कसंबे प्रणित प्रमाण यादीमुळे महाराष्ट्रातील पक्षीमित्रांच्या निरीक्षणास आणि लेखनास खूप मदत होईल हे निश्चित! तसेच लेखनात सुसूत्रताही येईल. यासाठी डॉ. राजू कसंबे यांचे अभिनंदन! या यादीबाबत काही सूचना कराव्याश्या वाटतात. (सूचना डॉ. कसंबे यांच्याकडे सुपूर्द. – संपादक.)

– डॉ. उमेश करंबेळकर, सातारा.

## ब्रिटनमधील चिमणी झिंदाबाद

आरएसपीबीकडून दर वर्षी ब्रिटनच्या नागरिकांनी जानेवारी महिन्यात आपल्याला दिसणाऱ्या पक्ष्यांची मोजदाद करून ती त्यांच्याकडे कळवावी असे आवाहन केले जाते. हे वर्ष ३७वे वर्ष होते. त्यात ५१९००० लोकांनी भाग घेतला व त्यांनी ८२६२६६२ पक्षी मोजले. त्यात पहिल्या क्रमांकावर होती चिमणी. महाराष्ट्राएवढ्या ब्रिटनमधून हा प्रतिसाद प्रचंड म्हटला पाहिजे. भारतात अशाच आवाहनामधून ७९०८ याद्या आल्या. त्या ११०५ पक्षीमित्रांनी पाठविल्या होत्या. त्यासाठी त्यांनी ५९३६ तास निरीक्षण करून ७८५ प्रजाती नोंदविल्या होत्या.

## खंड्याकडून पक्ष्याची शिकार

खंड्या उत्तम मासेमार म्हणून प्रसिद्ध आहे. पण उपाशीपोटी तो पक्ष्याची पिले पळवितो अशी घटना नमूद आहे. १७ ऑगस्ट २०१५ रोजी जामनगर जवळच्या रणजितसागर धरणावर एका पांढरपोटी खंड्याने झेप घेऊन फेंजंट टेल जकानाचे पिलू उचलले होते. ते गिळून झाल्यावर त्याने दुसऱ्या पिलावरही डल्ला मारला होता. *(फ्लेमिंगो (जाने-मार्च २०१६) वरून.)*

## भारद्वाजाने निवडणूक जिंकली

सावंतवाडी शहरपक्षी निवडण्यासाठी निवडणूक होऊन त्यात भारद्वाज बहुमताने निवडला गेला. शहरपक्षी नेमण्याची प्रथा प्रथमच सावंतवाडी शहराने सुरू केली आहे.

## वृक्ष लागवडीचा जागतिक विक्रम

भूतान हे हिमालयातील आपले छोटे शेजारी राष्ट्र आहे. लोकसंख्या सात लाख. पर्यावरण रक्षणासाठी अति जागरूक. तेथील ७०% भूभाग जंगलाने व्यापलेला आहे. तेथील भूतपूर्व राजे जिग्मे सिंग्मे वांगचुक यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने १०० स्वयंसेवकांनी एका तासात ४९६७२ वृक्षांचे रोपण केले. त्यामुळे पूर्वीचा जागतिक विक्रम दहा हजारांनी मोडला. गिनेस वर्ल्ड रेकॉर्डने त्याची नोंद घेतली आहे.

*(टायगर पेपर वरून)*


Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी – ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य : ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेल, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस – चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०